नागपूर
21/5/2018

प्रति,
मा. कार्यकारी अभियंता
राष्ट्रीय महामार्ग - विभाग
नागपूर

विषय:→ राष्ट्रीय महामार्ग-47 पिपळा डाग बंगला गावाजवळ (सावनेर रोड) सहजयोग ध्यान केंद्र फलक उभारण्याकरिता परवानगी मिळणेबाबत

महोदय,

सहजयोग ध्यान धारणा ही आत्मसाक्षात्कार प्राप्त करण्याची अत्यंत साधी पद्धती आहे. प. पू. श्रीमाताजी निर्मलादेवींच्या आशिर्वादाने प्रत्येक मानवामध्ये स्थित असलेली कुंडलीनी शक्ती ध्यानाद्वारे जागृत होवून साधकास शारिरीक, संसारिक, मानसिक व आध्यात्मीक शांती विनासायास प्राप्त होवू शकते.
सहजयोग ध्यान केंद्र, नागपूर तर्फे पी. के. साळवे ॲकेडमी फॉर म्युझीक ॲंड फाईन आर्ट, पिपळा डाक बंगला याठिकाणी सामुहिक ध्यान केंद्र दर रविवारी सकाळी दहा वाजता आयोजित केले जाते. सदर केंद्र राष्ट्रीय महामार्ग-47 वर कोलार नदी पुलानंतर मौजा बिडकवडस गावाच्या शिवारामध्ये स्थित आहे.

आपणास सविनय विनंती आहे की, उपरोक्त सहजयोग ध्यान केंद्रांच्या माहितीकरिता राष्ट्रीय महामार्ग-47 पिपळा डाक बंगला गावानंतर अंदाजे 1.5 किलोमीटर अंतरावर सहजयोग ध्यान

केंद्र तसेच विविध आध्यात्मिक कार्यक्रमाची माहिती दर्शविणारा फलक उभारण्याची परवानगी आम्हास प्रदान करावी. सदर फलक हा 10 foot x 15 foot असून राष्ट्रीय महामार्ग-44 नागपूर ते सावनेर रोडपासून 25 फुट अंतरावर लावण्याचा मानस आहे.

कृपया या आध्यात्मिक कार्यास आपण आम्हांस मदत करावी ही सविनय विनंती.

धन्यवाद

आपले कृपाभिलाषी
सहजयोग परिवार
विकाळे
(विवेक काळे)
जिल्हा समन्वयक
सहजयोग ध्यान केंद्र
नागपूर

संपर्क :- 09763046961
09823622952
08308060006

RECEIVED
Signature ........
Date 21/12/18
NHAI, PIU-2, NAGPUR